महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी-३५००/नमवि/(७४/२०००)/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० ऑगस्ट, २००१.

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

विषय : **ओरिएण्टल एज्युकेशन सोसायटी, जोगेश्वरी, मुंबई बी.एड. महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..**

संदर्भ : १) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे क्रमांक Aff./Recog./ २१४ of २०००, दिनांक १३.१.२००० चे पत्र.
२) शासन पत्र समक्रमांक, दि. ३१ मार्च, २०००.
३) क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्रीय समिती, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांची क्र. WRC/२-३२/२००१/३५७३, दिनांक १३.७.२००१ व दिनांक ३१. ७.२००१ ची पत्रे.

महोदय,

संदर्भाधिन संदर्भ क्रमांक १ वरील दिनांक १३.१.२००० च्या पत्रान्वये मुंबई विद्यापीठाने ओरिएण्टल एज्युकेशन सोसायटी, आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२ या संस्थेच्या बी.एड. महाविद्यालय सुरु करण्याच्या प्रस्तावाला परवानगी देण्याची शिफारस केली होती. त्या अनुषंगाने सदरहू संस्थेला सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून बी.एड. (इंग्रजी माध्यम) अभ्यासक्रमाचे महाविद्यालय आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२ या ठिकाणी सुरु करण्यासंदर्भात संदर्भ क्र. २ येथील दिनांक ३१.३.२००० च्या पत्रान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपण देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्रीय समिती, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांनी संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक १३.७.२००१ व ३१.७.२००१ च्या पत्रांनी कळविल्यानुसार ओरिएण्टल एज्युकेशन सोसायटी, आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२ या संस्थेच्या आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२ येथील बी.एड. (इंग्रजी माध्यम) अभ्यासक्रमासाठी सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत कार्यवाही करावी, असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

(कृपया मागे पहा.)

Oriental College of Education Andheri (W) MUMBAI

PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF EDUCATION & RESEARCH
Oriental Bldg., New Link Road, Adarsh Nagar,
Behind Lotus Petrol Pump, Andheri (W),
Mumbai- 400102

२. क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्रीय समिती, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांच्या दिनांक ३१.७.२००१ च्या आदेशानुसार पात्रता निकष, मुलभूत सुविधा, कर्मचारी वृंद व पाठयक्रम या संदर्भात निर्धारित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक आहे, याबाबत विद्यापीठाने संस्थेस स्पष्ट जाणीव करुन द्यावी.

३. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन शासनाने ओरिएण्टल एज्युकेशन सोसायटी, आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२ या संस्थेच्या बी.एड. महाविद्यालयांस राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, भोपाळ यांच्या आदेशानुसार खास बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(श. वि. दुर्वे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.
३) अध्यक्ष/सचिव, ओरिएण्टल एज्युकेशन सोसायटी, आदर्श नगर, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२.
४) निवडनस्ती/मशि-३



PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF EDUCATION
& RESEARCH ANDHERI (W). MUMBAI-102.

PRINCIPAL
ORIENTAL ... EDUCATION & RESEARCH
Oriental ... Road, Adarsh Nagar,
Behind ... Pump, Andheri (W),
Mumbai- 400102